# महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा २०१२
# जाहिरात क्रमांक २५१/२०१२
# घोषणा

आयोगातर्फे दिनांक ५ ऑगस्ट, २०१२ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषि सेवा (पूर्व) परीक्षा २०१२ मध्ये अर्हताप्राप्त ठरलेल्या एकूण २३४८ उमेदवारांची मुख्य परीक्षा दिनांक २१ जुलै, २०१३ रोजी फक्त मुंबई केंद्रावर घेण्यात येणार आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता आयोगाच्या **www.mahaonline.gov.in** या वेबसाईटवर नव्याने नोंदणी करुन ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहितीसह दिनांक ०३ जुलै, २०१३ पर्यंत अर्ज करण्याबाबत उमेदवारांना अवधी देण्यात आला होता. तथापि, या तारखेपर्यंत उमेदवारांनी अर्ज न केल्यामुळे दिनांक ०७ जुलै, २०१३ पर्यंत अर्ज सादर करण्यासाठी प्रथम मुदतवाढ देण्यात आली. तथापि, अद्यापर्यंतही काही उमेदवारांनी अर्ज सादर केलेले नसल्याने अशा उमेदवारांकरीता ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याकरीता **दिनांक १० जुलै, २०१३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** द्वितीय मुदतवाढ देण्यात आली आहे, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

मुंबई.
दिनांक : ०८ जुलै, २०१३

**अवर सचिव (परीक्षा पूर्व)**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग